पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते

**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 04/08/2025

आरोपी लोकसेवक 1) श्री सोमनाथ राघू कोल्हे वय 36 वर्ष ,पद. कोतवाल (वर्ग 4) नेमणूक, तलाठी सजा कार्यालय आपेगाव, ता. पैठण, जि, छत्रपती संभाजीनगर 2) अक्षय बबनराव बिनीवाले वय 30 वर्ष व्यवसाय नौकरी पद - तलाठी सजा आपेगांव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचे मौजे अगर नांदूर ता. पैठण शिवारात गट क्रमांक 58 मध्ये शेत जमीन समाईक क्षेत्र 50 आर होते. त्यापैकी तक्रारदार यांच्या नावे 16 आर जमीन क्षेत्र वाटणीपत्र करण्याकरिता 8,000/- (आठ हजार रुपये) रुपये लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे पैठण, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | **आरोपी लोकसेवक** - 1) श्री सोमनाथ राघू कोल्हे वय 36 वर्ष ,पद. कोतवाल (वर्ग 4) नेमणूक, तलाठी सजा कार्यालय आपेगाव, ता. पैठण, जि, छत्रपती संभाजीनगर, रा. आपेगाव, निळा झेंडा पाण्याच्या टाकी जवळ, ता. पैठण, जि, छत्रपती संभाजी नगर.<br>2) अक्षय बबनराव बिनीवाले वय 30 वर्ष व्यवसाय नौकरी पद - तलाठी सजा आपेगांव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर रा. पिरवाडी ता. बदनापूर जि. जालना ह.मु. म्हाडा कॉलनी, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर (वर्ग 3 ) |
| लाच मागणी रक्कम | 8,000/- (आठ हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 8,000/- ( आठ हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | श्री. चैनसिंग घुसिंगे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. धर्मराज बांगर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे मौजे अगर नांदूर ता. पैठण शिवारात गट क्रमांक 58 मध्ये शेत जमीन समाईक क्षेत्र 50 आर होते. त्यापैकी तक्रारदार यांच्या नावे 16 आर जमीन क्षेत्र आहे. दिनांक 25/07/2025 रोजी तक्रारदार यांनी वाटणीपत्र करण्याकरिता बॉण्ड तयार करून जमिनीचे कागदपत्राची फाईल आलोसे क्रमांक एक यांच्याकडे दिली होती.<br>दिनांक 01/08/2025 रोजी तक्रारदार यांनी आलोसे क्रमांक एक यांना संपर्क करून जमिनीची वाटणीपत्र करीता दिलेल्या फाईल संदर्भाने विचारपूस केली असता आलोसे क्रमांक एक यांनी जमिनीची वटणी पत्र करून देण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे 10,000 (दहा हजार) रुपयाची मागणी केली असल्याची तक्रार ला.प्र. वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे प्राप्त झाली होती. |
| थोडक्यात माहिती | दिनांक 04/08/ 2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष आलोसे क्रमांक एक सोमनाथ कोले, यांच्याकडे तक्रारदारास पाठवून पडताळणी केली असता आलोसे क्रमांक एक यांनी तक्रारदार यांच्याकडे वाटणीपत्र चा प्रस्ताव तलाठी यांच्याकडे पाठवणे करिता 8000/- हजार रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>आलोसे यांच्या लाच मागणी पडताळणी नंतर दिनांक 04/08/2025 रोजी शासकीय पंच समक्ष तहसील कार्यालय पैठण, शासकीय इमारत , पैठण या ठिकाणी सापळा कारवाई आजमावली असता आलोसे क्रमांक एक यांनी आलोसे क्रमांक दोन यांना फोन करून व प्रत्यक्ष भेटून तक्रारदार यांनी वाटणीपत्राचे कामकाजकरिता आठ हजार रुपये घेत असले बाबत कळविल्याने आलोसे क्रमांक दोन यांनी आलोसे क्रमांक एक यांना लाच घेण्याकरिता संमती देऊन प्रोत्साहन दिल्याने आलोसे क्रमांक एक यांनी तक्रारदार यांच्याकडून 8000/- (आठ हजार रुपये) रुपयांची लाचेची रक्कम पंचा समक्ष स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>आलोसे क्रमांक एक यांनी तक्रारदार यांच्या कडे वाटणी पत्र चा प्रस्ताव तलाठी यांच्याकडे पाठविण्यासाठी व स्वतः करिता तक्रारदार यांच्या कडे 8000/- (आठ हजार रुपये) रुपये लचेची मागणी करून आलोसे क्रमांक दोन यांनी लाच घेण्याकरिता संमती व प्रोत्साहन दिल्याने आलोसे क्रमांक एक यांनी पंच समक्ष स्वीकारली आहे, सबब आलोसे यांच्या विरोधात पोलीस ठाणे पैठण, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण ) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन नमुद आरोपी लोकसेवक यांना अटक करुन तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक तथा पोलीस उप अधीक्षक श्री.सुरेश ह. नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री. चैनसिंग घुसिंगे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक, श्री.धर्मराज बांगर, पोलीस अंमलदार युवराज हिवाळे, राजेंद्र नंदिले, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1) spacbaurangabad@mahapolice.gov.in , 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार अ‍ॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923247986

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986


SD

सुरेश ह.नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर